**काहीसं मिळताना हातून**

काहीसं मिळताना हातून, बरंच काही सटकतंय,

पर्याय याला काही नाही, एवढं मात्र समजतंय..

खरंच का असतं सगळं असं, अनिर्णीत-अनिश्चित ?

उत्तर याला काही नाही, एवढं मात्र उमगतंय !

आयुष्य मिळालं कितीही जरी, 'त्याने'च तर ते आखलेलं,

कुणी लावलेल्या पणतीपरी, आपण फक्त जळायचंय !

आधार शोधत ह्याचा-त्याचा, जरी घालवले सारे क्षण,

एकलीच परी या जागी मी, हे सत्यच फार सतावतंय !

तुमची-माझी एक कहाणी, तुम्हालाच काय सांगायचे?

अर्थहीन हे शब्दं सारे, आज-आता जाणवतंय !!!

**- प्रीती देशपांडे**

http://www.meetipreeti.com/